## -:: प्रकरण - २ रे ::-

## ऊसतोडणी कामगारांना काम देणारे कारखाने

# प्रकरण २ रे

## ऊसतोडणी कामगारांना काम देणारे कारखाने

२.१ प्रास्ताविक

२.२. साखर उद्योग - महाराष्ट्रातील स्थिती

२.३ सहकारी चळवळ आणि ऊसतोडणी कामगार

२.४ सहयाद्री सहकारी साखर कारखाना, शिरवडे

२.५ कृष्णा सहकारी साखर कारखाना, रेठरे बु ।।

# प्रकरण - २ रे

## ऊसतोडणी कामगारांना काम देणारे कारखाने

### २·१ प्रास्ताविक :

साखर उद्योग हा भारतात अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे· त्यामुळे भारताला साखर उद्योगाचा जनक म्हणता येईल· इ·स·पूर्व ४ थ्या शतकातील भारतातील साखरेच्या बाबतीत सम्राट शिकंदराने उल्लेख केला आहे· १६ व्या शतकाच्या मध्यावधीमध्ये लिहिलेल्या चिनी ज्ञानकोशात साखर उद्योगात भारत अग्रेसर आहे, याचा उल्लेख आहे· ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात भारतातील साखर उद्योग संपुष्टात आला· १९०३ साली ब्रिटीशांच्या प्रयत्नाने भारतात साखर उद्योग सुरु झाला·[१] भारतातील साखर उद्योगाचा विकास हा गेल्या ७५ ते ८० वर्षात झालेला विकास आहे· भारताला स्वातंत्र्य प्राप्ती होईपर्यंतच्या काळात भारतात जो साखर उद्योग अस्तित्वात होता तो सर्व खाजगी क्षेत्राच्या ताब्यात होता· १९६६-६७ सालापर्यंत सुध्दा साखर उद्योगात म्हणावी इतकी प्रगती नव्हती· १९६७-६८ साली ५ ते ६ महिन्यापेक्षा जास्त दिवस गळीत हंगाम करणारे भारतातील कारखाने फक्त २४ होते· त्यावेळेस भारतात एकूण कारखाने १९८ होते·[२]

महाराष्ट्रात विशेषत: सहकारी साखर कारखान्यांचा विकास अतिशय झपाटयाने झाला· १९५० साली नगर जिल्हयातील प्रवरानगर येथे पद्मश्री कै·विठ्ठलराव विखे पाटील यांनी कै·धनंजयराव गाडगीळ, कै·वैकुंठभाई मेहता या तज्ञांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली पहिला

सहकारी साखर कारखाना यशस्वीरित्या सुरु केला. त्यानंतर सहकारी साखर उद्योगाने कधी माघार घेतली नाही. सतत पुढची झेप हा उद्योग घेत आला आहे. याला प्रामुख्याने केंद्र व राज्य सरकारचे सहकारी क्षेत्राला अनुकूल धोरण कारणीभूत मानता येईल.

## २.२. साखर उद्योग - महाराष्ट्रातील स्थिती :

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा खाजगी क्षेत्रापेक्षा सहकारी क्षेत्रातच अधिक विकसित झाला आहे. महाराष्ट्रात मे १९८९ अखेर सहकारी क्षेत्रात ९१ साखर कारखाने तर खाजगी क्षेत्रात ५ साखर कारखाने होते.[३] कराड तालुक्यामध्ये साखर उद्योग हा २ सहकारी साखर कारखान्यांच्या ताब्यात आहे. ऊसउद्योगाचा अल्प प्रमाणावरील भाग खाजगी गु-हाळे व खांडसरी उद्योगाकडे आहे. या अभ्यास विषयाच्या संदर्भात विचार करताना कराड तालुक्यातील सहकारी साखर उद्योगातीलच ऊसतोडणी कामगारांचा विचार केलेला आहे.

## २.३ सहकारी चळवळ आणि ऊसतोडणी कामगार :

सहकारी चळवळीमध्ये " पिळवणूक " ही बाब येउ शकत नाही. किंबहुना " पिळवणूक " यावर उपाय म्हणूनच सहकाराचा वापर सुरु करणेत आलेला आहे. महाराष्ट्रातील सहकारी नेतृत्वाने आणि शेतक-यांनी साखर उद्योगात सहकाराच्या जोरावर क्रांती घडवून आणली आहे. समाजातील सर्व घटकांना सहकारी चळवळीत न्याय मिळावा अशी अपेक्षा आहे. सहकारी साखर कारखान्यानी कारखाना परिसरात घडवून आणलेले अमूलाग्र परिवर्तन पाहिले तर सहकारी साखर उद्योगाच्या ताकदीची प्रचिती आल्यावाचून रहात नाही.

सहकारी साखर उद्योगामधील ऊसतोडणी कामगारांची स्थिती पाहिल्यावर मात्र सहकारी साखर कारखानदारीने प्रगतीच्या उच्च शिखराच्या पायथ्याखाली चिरडल्या जात असलेल्या ऊसतोडणी कामगाराकडे विशेष लक्ष दिले नसल्याचे जाणवण्यास सुरुवात होते. विकासात्मक प्रगती आपण शेवटच्या घटकापर्यंत पोहचवू शकलो नाही ही गोष्ट मान्य करताना मा.यशवंतराव मोहिते यांनी जंगल कामगारांचे उदाहरण दिले आहे.[४] पण हीच गोष्ट ऊसतोडणी कामगारांच्या बाबतीत देखील सत्य आहे, विशेष म्हणजे येथे त्यांच्याच व्यवस्थापनाखालील कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या क्षेत्रात काम करणा-या ऊसतोडणी कामगारांचा अभ्यास करण्याचा योगायोग साध्य झाला आहे. ग्रामीण भागामध्ये सहकाराने केलेली कृषी उद्योग क्रांती नाकारता येणार नाही. पण सहकाराचा मूळ उद्देश काय होता ? तळागाळातल्या नापतदारांचे जीवन त्यांना पतदार बनवून उन्नत करणे हे साध्य झाले का ? याचे स्पष्ट उत्तर "नाही" असे द्यायला हवे.[५] या विधानाचे प्रत्यंतर ऊसतोडणी कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती पाहिल्यावर आपणास आढळून येते.

सहकारी साखर उद्योगात कंत्राटी पध्दतीने कामगारांची भरती होऊन देखील त्यावर नियंत्रण नसते. कारखान्याचे व्यवस्थापन त्यांना आपले कामगार मानण्याबाबत संदिग्धता पाळते. त्यांची पिळवणूक करणारे मध्यस्थ कारखान्याशी राजरोस व्यवहार करतात हे सहकारी क्षेत्राला निश्चित भूषणावह नाही. सहकारी क्षेत्रात देखील पिळवणूक होते. गुलामगिरीचे जीवन भोगणारे कामगार आहेत हे निश्चित हितावह नाही. या मध्यस्थाच्या उच्चाटनासाठी कारखान्यातील "ऊस वहातूक सोसायटया",[६] स्थापन करुन त्यामार्फत बैलगाडयांचा ताफा बाळगणे मध्यस्थाना शह देण्यासारखे होईल. पण त्याचबरोबर "तोडणी वहातुकीचे यांत्रिकीकरण",[७] कल्पना आणणे श्रमशक्तिच्या दृष्टीकोनातून योग्य ठरणार नाही. याची

कल्पना कारखान्यानी घेणे आवश्यक आहे. अन्यथा पिळवणुकीपेक्षा कामगारांचे उच्चाटन असा अनहितकारी निर्णय घेणे योग्य ठरणार नाही.

थोडक्यात, महाराष्ट्रातील साखर कारखानदारीने आज उच्च शिखर प्राप्त केले आहे असा दावा केला जातो. पण या साखर कारखानदारीशी संबंधित अशा ऊसतोडणी कामगाराची स्थिती जोवर सुधारु शकत नाही तोपर्यंत सहकारी क्षेत्रातील साखर ख-या अर्थाने गोड होऊ शकणार नाही. ऊसतोडणी कामगार हे सहकारी साखर उद्योगातील महत्वाचे घटक आहेत. परंतु त्यांना सेवेची कसलीही शाश्वती नाही. कोणत्याही सुविधा नाहीत. कारखान्यासाठी काम करावयाचे पण नियंत्रण कंत्राटदाराचे असे, वेठबिगारीचे स्वरूप सहकारी साखर उद्योगात मोठया प्रमाणात पसरले आहे. याला अपवाद म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव कारखाना म्हणून हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना,वाळवा मानला जातो. श्री.सु.दा.तुपे यांनी एका सहकारी कारखान्यासाठी ऊसवहातुकीला साधारणत: ५०० ते ६०० बैलगाडया, ३५ ते ४० ट्रक व तेवढेच ट्रॅक्टर व ४५०० ते ५००० मजूर लागतात असे मत मांडले आहे.[८] म्हणजेच साखर कारखानदारीसाठी मजूरांची मोठया प्रमाणावर आवश्यकता आहे. तेंव्हा या मजूरांना जीवनावश्यक सुविधा मिळणे हे ही तितकेच महत्वाचे आहे. हे मान्य करावे लागेल. ऊसतोडणी कामगार कारखाना परिसरात जे स्थलांतर करतो ते मजूरी दरातील तफावतीपेक्षा रोजगारीच्या संधीवर जास्त अवलंबून असते.[९] हे येथे प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागते. अन्यथा एवढया समस्या असताना जर इतरत्र रोजगार उपलब्ध होऊ शकला असता तर ऊसतोडणी कामगार या क्षेत्राकडे आले नसते.

कराड तालुक्यात ऊसतोडणी काम देणा-या सहकारी साखर कारखान्यांची संख्या दोन आहे. त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

२·४ सहयाद्री सहकारी साखर कारखाना शिरवडे :

कै·यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रेरणेने व कृषी औद्योगिक समाजरचनेच्या ध्येयाने या कारखान्याची स्थापना १९७४ साली झाली· कर्जमुक्तता, भक्कम आर्थिक पाया आणि दूरदर्शी नियोजन हे या कारखान्याचे वैशिष्टय आहे· कारखान्याच्या इमारतीची व यंत्रसामुग्रीची रचना ५000 मेट्रिक टन प्रतिदिन गाळपक्षमता निर्माण होऊ शकेल· अशा रितीने सुरवातीपासून ठेवण्यात आली होती· सध्या कारखान्याची गाळपक्षमता ५000 मेट्रिक टन ( प्रतिदिन ) आहे· कारखान्याने सामाजिक कार्यात देखील जास्त रस घेतला आहे· कुटुंब कल्याण, मागासाना अनुदान, गोबर गॅस योजना, वनीकरण, शिक्षण व क्रिडा क्षेत्राला प्रोत्साहन, घरकुले असे उपक्रम चालू केले आहेत·

२·५ कृष्णा सहकारी साखर कारखाना रेठरे बु।। :

सहकार महर्षी यशवंतरावजी मोहिते यांच्या प्रयत्नातून या कारखान्याची उभारणी सन १९५५ साली झाली· या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात कराड तालुका तसेच सांगली जिल्हयाचा कांही भाग येतो·

या कारखान्याने सहकाराच्या माध्यमातून शैक्षणिक, सांस्कृतीक व सामाजिक क्षेत्रात खूपच महत्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत· ऊसतोडणी कामगारांची सहयाद्रीपेक्षा जास्त संख्या या कारखान्यात काम करताना आढळते·

–x–x–x–x–x–

संदर्भ :


१. सी.बी.मेमोरीया,१९७१, ऑर्गनायझेशन अॅन्ड फायनान्सींग ऑफ इंडस्ट्रीज इन इंडीया, अलाहाबाद , किताब महल, पृष्ठ ४६१

२. तत्रैव - पृष्ठ २८२.

३. गोडवा - मे,१९८९ " सांख्यीकी " मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ.

४. यशवंतराव मोहिते, १९७० महाराष्ट्र राज्य सहकारी चळवळ एक पुर्नमुल्यांकन, मुंबई,शासकीय मुद्रणालय, पृष्ठ ८ व १९.

५. रा.म.बिवलकर, १९८७ " महाराष्ट्रातील सहकारी आचार विकार - विकास " इन सर्च ऑफ को.ऑपरेटीव्ह एक्सीलन्स ,मुंबई संपादक - जी.एस.शेंदुर्णीकर, प्र.भा.एस.शेंदुर्णीकर. एम.एस.सी.बॅन्क, लि., पृष्ठ २४७.

६. यशवंतराव मोहिते १९७४ महाराष्ट्रातील ऊस उद्योग प्रगतीचा आराखडा पुणे, भारती विद्यापीठ प्रकाशन पृष्ठ ६३.

७. तत्रैव - पृष्ठ ६२.

८. एस.डी.तुपे. "इम्पॅक्ट ऑफ शुगर फॅक्टरीज ऑन रुरल इकॉनॉमी". (पी.एच.डी.प्रबंधाचा सारांश) अर्थसंवाद एप्रिल,जून,८८ खंड १२ अंक १, मुंबई, मराठी अर्थशास्त्र परिषद पृष्ठ ४७.

९. सु.गो.भानुशाली आक्टों.-डिसेंबर,१९८८ "इम्पॅक्ट ऑफ अॅग्रोबेस्ड इंडस्ट्रीज ऑन रुरल इकॉनॉमी" (ग्रंथ परीक्षण) अर्थ संवाद,मुंबई मराठी अर्थशास्त्र परिषद, पृष्ठ- २९.